# नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांचा ‘आविष्कार’

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट यांच्या वतीने संयोजित आविष्कार २०१८-१९ या संशोधनविषयक स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शुक्रवारी झाले.


विद्यापीठाच्या लोककला सभागृहात झालेल्या या स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठांतर्गत जिल्हास्तरीय, पदव्युत्तर व मध्यवर्ती अशा या त्रिस्तरीय संशोधन स्पर्धेला संशोधक विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत सुमारे दोनशे संशोधकांनी सहभाग दर्शविला. भाषा, ललितकला, शिक्षणशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुसंवर्धन अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि वैद्यक व औषधनिर्माण शास्त्र अशा विविध विषयांमधील शोधनिबंध, पोस्टर सादरीकरण, पॉवरपॉईंट सादरीकरण आणि मॉडेल्स अशा विविध प्रकारांत त्यांनी आपले संशोधन मांडले. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच एम.फील. व पीएच.डी.चे संशोधन करणारे संशोधक विद्यार्थी, शिक्षक स्पर्धेत सहभागी झाले होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात आयोजित आविष्कार संशोधन स्पर्धेत सहभागी संशोधकांकडून शुक्रवारी त्यांच्या संशोधनाची माहिती घेताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

**कोळपणीचे देशी यंत्र** *शेतातील तण काढण्यासाठी जुन्या मोटारसायकलीचा खुबीने वापर करून राजारामबापू इन्स्टिट्यूटमधील एमबीएच्या विद्यार्थ्यांनी देशी यंत्र बनवून या ठिकाणी प्रात्यक्षिक सादर केले. अशा अनेक विद्यार्थ्यांनी उपयोगीतामूल्य असणारे संशोधन सादर केल्याचे दिसून आले.*




दरम्यान, शुक्रवारी (दि. ४ जानेवारी) विद्यापीठात आयोजित आविष्कार स्पर्धेत पदवी स्तरावरील संशोधक विद्यार्थ्यांबरोबरच आजच्या स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या पदव्युत्तर स्तरावरील स्पर्धकही सहभागी होणार आहेत, अशी माहिती समन्वयक डॉ. गुरव यांनी दिली. सर्वच अधिकाऱ्यांनी सहभागी संशोधक विद्यार्थ्यांकडे जाऊन त्यांच्या प्रकल्पांविषयी जाणून घेतले. विविध अभिनव विषयांवरील सादरीकरण विद्यार्थ्यांनी केल्याचे पाहून कुलगुरू डॉ. शिंदे यांनी समाधान व्यक्त केले आणि सहभागी संशोधकांचे अभिनंदन केले.


29 DEC 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांचा विद्यापीठात 'आविष्कार'

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे संयोजित 'आविष्कार २०१८-१९' या संशोधनविषयक स्पर्धेस शुक्रवारी प्रारंभ झाला. विद्यापीठाच्या लोककला सभागृहात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी सहभागी संशोधक विद्यार्थ्यांकडे जाऊन त्यांच्या प्रकल्पांविषयी जाणून घेतले. विविध अभिनव विषयांवरील सादरीकरण विद्यार्थ्यांनी केल्याचे पाहून कुलगुरू डॉ. शिंदे यांनी समाधान व्यक्त केले आणि सहभागी संशोधकांचे अभिनंदनही केले.



**कोल्हापूर : आविष्कार संशोधन स्पर्धेत सहभागी संशोधकांकडून माहिती घेताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

शिवाजी विद्यापीठांतर्गत जिल्हास्तरीय, पदव्युत्तर व मध्यवर्ती अशा या त्रिस्तरीय संशोधन स्पर्धेला संशोधक विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. शुक्रवारच्या स्पर्धेत सुमारे दोनशे संशोधकांनी सहभाग दर्शवला. भाषा, ललितकला, शिक्षणशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुसंवर्धन अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि वैद्यक व औषधनिर्माण शास्त्र अशा विविध विषयांमधील शोधनिबंध, पोस्टर सादीकरण, पॉवरपॉईंट सादरीकरण आणि मॉडेल्स अशा विविध प्रकारांत त्यांनी आपले संशोधन मांडले. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच एम. फिल. व पीएच.डी.चे संशोधन करणारे संशोधक विद्यार्थी, शिक्षक स्पर्धेत सहभागी झाले. दरम्यान, शुक्रवार दि. ४ जानेवारी २०१९ रोजी विद्यापीठात आयोजित आविष्कार स्पर्धेत पदवी स्तरावरील संशोधक विद्यार्थ्यांबरोबरच शुक्रवारच्या स्पर्धेतील पारितोषिक विजेते पदव्युत्तर स्तरावरील स्पर्धकही सहभागी होणार आहेत, अशी माहिती समन्वयक डॉ. गुरव यांनी दिली.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, समन्वयक तथा अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

# नवनवीन प्रयोगांसह कल्पक संकल्पना

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

उत्सुकता वाढवणारे नवनवे प्रयोग, तरुण संशोधकांच्या कल्पक संकल्पना, तंत्रज्ञान, कृषी, विज्ञान, कला अशा विविधांगी विषयांना स्पर्श करणारे अभिनव प्रयोग अविष्कार संशोधन महोत्सवात अनुभवायला मिळाले. 'स्पेक्ट्रल माउस', वायरलेस वॉटर लेवल मॉनिटरिंग कंट्रोलर, तेल आणि पाणी वेगळे करणारा प्रयोग तसेच इंटरनेटवरून कचरा भरल्याचे नोटिफिकेशन्स देणारे स्मार्ट डस्टबीन असे प्रकल्प महोत्सवाचे आकर्षण ठरले.

## आविष्कार संशोधन स्पर्धेला विद्यापीठात प्रारंभ

यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठात १३ व्या आविष्कार संशोधन स्पर्धेला शुक्रवारी प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते लोककला केंद्रात स्पर्धेचे उद्घाटन झाले. स्पर्धेत पदवीस्तरीय विद्यार्थी, पदव्युत्तर व पदव्युत्तरोत्तर तसेच शिक्षक अशा गटातील एकूण ३१७ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. लोककला केंद्रात सकाळपासून आपले प्रयोग मांडण्यासाठी विद्यार्थ्यांची लगबग सुरू होती. प्रयोगाचे प्रात्यक्षिक तसेच त्याची माहिती पोस्टरच्या माध्यमातून लावण्यात आली होती. संशोधनाची आणि तंत्रज्ञानाची आवड असणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांनी महोत्सवाला भेट दिली. 'कॉलेज जीवनात संशोधन वृत्तीला चालना मिळावी यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या ठरतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या नवनिर्मितीला चालना मिळत असते. आविष्कार संशोधन स्पर्धा ही विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला अधिक वाव देणारी आहे,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी यावेळी केले. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते.





आविष्कार संशोधन महोत्सवात विविधांगी विषयांना स्पर्श करणारे अभिनव प्रयोग अनुभवायला मिळाले.

### दिव्यांगांसाठी 'स्पेक्ट्रल माउस' वरदान

दोन्ही हात नसलेल्या दिव्यांगाना कॉम्प्युटर सहजरीत्या हाताळता यावा यासाठी स्पेक्ट्रल माउस तयार करण्यात आला होता. या डिव्हाईसमध्ये डोळ्यांना असणाऱ्या चष्म्याच्या सहायाने सेन्सॉरच्या माध्यमातून कॉम्प्युटरला कमांड देण्याची यंत्रणा विकसित करण्यात आली आहे. यामध्ये डोळ्याच्या पापण्यांच्या सहायाने देखील कॉम्प्युटर नियंत्रित करता येतो.

### कचरा निर्मूलनासाठी 'स्मार्ट डस्टबिन'

अजय माने या विद्यार्थ्याने तयार केलेला 'स्मार्ट डस्टबिन' हा कचरा निर्मूलनात प्रभावी ठरू शकतो. या प्रयोगात डस्टबिनच्या झाकणाला सेन्सॉर बसवण्यात आले आहेत. त्यामुळे कचरा ७५ टक्क्याहून अधिक झाल्यास आपोआप मोबाईल तसेच मेलवर नोटिफिकेशन देण्याची सोय करण्यात आली आहे. यासाठी 'लाइव्ह ॲप' विकसित करण्यात आले आहे.

### महोत्सवातील आकर्षण

महोत्सवातील प्रयोगात अपंगांसाठी असणारे 'स्पेक्ट्रल माउस', वायरलेस वॉटर लेवल मॉनिटरिंग कंट्रोलर, तेल आणि पाणी वेगळे करणारा प्रयोग तसेच इंटरनेटवरून कचरा भरल्याचे नोटिफिकेशन्स देणारे स्मार्ट डस्टबीन, तुकडे झालेल्या तांदळावर प्रक्रिया करून नव्याने तांदूळ तयार करणारा राइस प्रकल्प, डेंगीवरील रुग्णांसाठी महत्त्वपूर्ण ठरणारा पपया आणि ड्रॅगन फ्रूट यांपासून बनवलेला ज्यूस, मोठ्या वाहनांसाठी सस्पेंशन तयार करणारे इलेक्ट्रिकल शॉकप्सर, ऊर्जेचे जतन करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणारा 'सुपर कपॅसिटर' हे प्रयोग उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारे ठरले.

### हे होते स्पर्धा प्रकार

मानववंशशास्त्र, भाषा, अभिजात कला, शिक्षण व वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा तसेच मूलभूत विज्ञान, शेती आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र व औषध शास्त्र अशा प्रकारांत ही स्पर्धा घेण्यात आली.

2 9 DEC 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# University-level Avishkar research festival begins at SUK with pomp

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Vice-chancellor of Shivaji University, Kolhapur (SUK) Devanand Shinde and other officials of the university inaugurated the university-level Avishkar research festival at Lok Kala Kendra on Friday.

Organised by SUK in association with Yashwantrao Chavan School of Rural Development (YCSRD), the festival is an initiative from the chancellor's office to boost the spirit of research among students and faculty members.

According to SUK officials, around 200 PG students and MPhil and PhD scholars participated in the festival on Friday. The winners from the district and university level will compete at the central Avishkar festival that will be held at the campus on January 4, 2019. The winners from the central research festival will advance to the state-level which will be held sometime next year.

"The festival is organized in six educational categories—humanities, commerce, pure sciences, agriculture and animal husbandry, engineering and technology, and medicine and pharmacy. The festival is open to under-graduate students, post-graduate students, research scholars and faculty members," a SUK official said.

SUK's pro-vice chancellor D T Shirke said that the students' response and the familiarity with the festival has evolved over time and the response that they were receiving was better than last few years.

The innovative project and the innovative presentation is the key aspect of the Avishkar festival.

Amit Gadre



The festival saw participation of around 200 students

लोकमत

# विद्यापीठात अनोख्या प्रकल्पांचे सादरीकरण

## आविष्कार संशोधन महोत्सव : गटातील विजेत्यांची ४ जानेवारीला अंतिम स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दिव्यांग विद्यार्थी, व्यक्तींसाठी चष्म्यांद्वारे संगणकासाठी वापरता येणारा स्पेक्टॅकल्स् माऊस, स्मार्ट ब्लाईंड स्टीक, गतिरोधक आणि वाहनांमुळे निर्माण होणाऱ्या वाऱ्यावर बीजनिर्मिती करणारा सडक बिजली जनरेटर, असे विविध स्वरूपातील नवसंशोधनाचे दर्शन शुक्रवारी घडले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठातील आविष्कार संशोधन महोत्सवाचे. या महोत्सवात पदव्युत्तर पातळीवरील प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी संशोधन विषयक विविध प्रकल्प सादर केले.

महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, महोत्सवाचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, पी. एस. पाटील, आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर प्रमुख उपस्थितांनी महोत्सवातील प्रकल्पांची पाहणी करून विद्यार्थी-विद्यार्थिनींसमवेत संवाद साधला. तज्ज्ञांनी प्रकल्पांचे परीक्षण केले. या महोत्सवात विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या अमोल माळी याने अल्ट्रासोनिक सेन्सरच्या वापरातून दिव्यांगांसाठी तयार केलेली स्मार्ट ब्लाईंड स्टीक सादर केली. ओमकार साळुंखे याने डोळे आणि डोक्याच्या हालचालींद्वारे दिव्यांग, दोन्ही हात नसलेल्या व्यक्तींना वापरता येणाऱ्या संगणकाच्या माऊसचे संशोधन मांडले. घरातील पाणीसाठ्याची माहिती देणाऱ्या वायरलेस यंत्रणेचे उपकरण पांडुरंग गायकवाडने सादर केले. योगेश माने याने साप पकडण्यासाठीच्या पर्यावरणपूरक स्टीकचे संशोधन मांडले. महोत्सवात २०० पदव्युत्तर संशोधक, शिक्षक, विद्यार्थी स्पर्धक सहभागी झाले. त्यांची उपकरणे, प्रकल्प पाहण्यासाठी दिवसभर विद्यार्थ्यांनी गर्दी केली. गटातील विजेत्यांची अंतिम स्पर्धा दि. ४ जानेवारीला होणार आहे.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी आयोजित अविष्कार महोत्सवात स्पेक्टॅकल्स् माऊसची माहिती विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने घेतली.

### भित्तीपत्रकांतून अभ्यासपूर्ण मांडणी

या महोत्सवातील अधिकतर स्पर्धकांनी भित्तीचित्रांचे सादरीकरण केले. त्यात इस्लामपूर शहरातील ई-शॉपिंग, भारतातील ग्रामीण उद्योगांच्या समस्या व उपाययोजना, उचगावमधील पारधी समाजाची भाषा, बांबूपासून विविध वस्तू करणाऱ्या बुरुड समाजाची स्थिती, दुष्काळी भागातील महिला उद्योगांसमोरील समस्या, भाषिक उपाययोजनांची क्षेत्रे व मराठी भाषेतील रोजगाराच्या संधी, फौंड्री उद्योगातील कामगारांची स्थिती आदी विषयांची अभ्यासपूर्ण मांडली केली.



29 DEC 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोककला केंद्रात संशोधनाचा आविष्कार...

## शिवाजी विद्यापीठात संशोधनविषयक स्पर्धेस प्रतिसाद

कोल्हापूर, ता. २८ : कमी खर्चात तुतीची लागवड, ब्लुटूथद्वारे तापमान व आर्द्रतेचे मोजमाप, स्पीडब्रेकरद्वारे विजेची निर्मिती, फाउंड्री उद्योगातील कामगारांची स्थिती, अशा विविधांगी संशोधनाचा आविष्कार शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात अनुभवता आला. संशोधकीय वृत्तीतून पदव्युत्तर, एम. फिल. व पीएच. डी.च्या विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले. शेतकऱ्यांचे जीवनमान, अंधांना वापरण्यासाठीची सेन्सर स्टिक ते स्नेक कॅचिंग स्टिक प्रकल्पाने विशेष लक्ष वेधले. विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित आविष्कार २०१८-१९ संशोधनविषयक स्पर्धेस चांगला प्रतिसाद मिळाला.

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील प्रा. बाबूराव घुरके यांनी 'कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागातील शेतकऱ्यांचे आर्थिक-सामाजिक जीवन' प्रकल्प मांडला. सात तालुक्यांतील चौदा गावांमधील ३१५ शेतकऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीची केलेली पाहणी त्यांनी पोस्टरद्वारे मांडली होती.



कोल्हापूर : आविष्कार संशोधन स्पर्धेत योगेश माने याने तयार केलेली स्नेक कॅचिंग स्टिक. दुसऱ्या छायाचित्रात प्रतीक्षा यादव हिने ब्लुटूथद्वारे तापमान व आर्द्रता मोजण्याचे तयार केलेले तंत्र. शेवटच्या छायाचित्रात शाम बंडगर याने सादर केलेला 'सडक बिजली जनरेटर'चा संशोधन प्रकल्प. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

प्राणीशास्त्र अधिविभागातील रोहित कदम याने इचलकरंजीतील इमारतीच्या टेरेसवर कल्पकतेने तुतीची नर्सरी सुरू केली आहे. बायोटेक्नॉलॉजीकल संकल्पना वापरून कमी खर्चात तुतीची नर्सरी करता येऊ शकते, हे त्याने दाखवून दिले.

योगेश माने याने घरगुती पद्धतीची अनोखी 'स्नेक कॅचिंग स्टिक' तयार केली होती. इलेक्ट्रॉनिक्स सायन्समधील ओंकार साळुंखेने 'स्पेक्टॅकल माऊस', तर कॉम्प्युटर सायन्सची विद्यार्थिनी प्रतीक्षा यादव हिने 'ब्लुटूथद्वारे तापमान व आर्द्रतेचे मोजमाप' कसे करता येऊ शकते, याचा प्रयोग मांडला होता.

रसायनशास्त्रातील सुशांत गवळीने 'ऑईल वॉटर सेपरेशन बाय वेस्ट पॅकिजिंग मटेरियल्स', तर शाम बंडगरने 'सडक बिजली जनरेटर'ची कल्पना मांडली होती. स्पीडब्रेकरद्वारे वीजनिर्मितीचा तो प्रयोग होता. वाणिज्य शाखेतील एम. एम. पुरोहित हिने 'ए स्टडी ऑफ प्राइस फ्लक्च्युएशन ऑफ रिलेटेड ॲग्रीकल्चरल प्रोड्यूस इन श्री शाहू मार्केट यार्ड', प्रा. विद्या स्वामी यांनी 'ए स्टडी ऑन वर्कर्स बिऐव्हिअर टूवर्डर्स फाउंड्री इंडस्ट्री विथ स्पेशल रेफरन्स मॅनेजमेंट प्रॅक्टिसेस' विषयावर प्रकल्प सादर केला.

### संशोधन प्रकल्प

**स्पर्धेत भाषा, ललितकला, शिक्षणशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुसंवर्धन अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यक व औषधनिर्माणशास्त्र विषयांमधील शोधनिबंध, पोस्टर व पॉवरपॉइंट सादरीकरणासह मॉडेल्सद्वारे संशोधन प्रकल्प मांडले.**



आदिनाथ कांबळे याने हातकणंगले तालुक्यातील बुरूड समाजाच्या बांबू क्राफ्टच्या व्यवसायातील समस्या, गणेश तारदाळकरने 'सिस्टिमेटिक मार्केट', अभिषेक श्रीरामने पारध्यांची भाषा, तर प्रा. सुनील भोसले यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यात जलयुक्त शिवार अभियानात झालेल्या कामांचा प्रकल्पाद्वारे वेध घेतला होता.

तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

29 DEC 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांनी देशाचे नाव उंचवावे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : मूक-कर्णबधिर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

दिव्यांग विद्यार्थ्यांत सर्वसाधारण व्यक्तींपेक्षाही अधिक कार्यक्षमता असते. त्यांनी या क्षमतेच्या बळावर आपल्या देशाचे नाव उज्ज्वल होईल अशी कामगिरी बजावावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग व मूक-कर्णबधिर असोसिएशन, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तीनदिवसीय मूक-कर्णबधिर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचा उद्घाटन समारंभ शुक्रवारी सायंकाळी लोककला केंद्रात झाला, त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, मूक-कर्णबधिर मुलांमध्ये सहज संवादाच्या प्रेरणा असतात. त्यामुळे ते सर्वसाधारण व्यक्तींशी अतिशय उत्तम प्रकारे संवाद साधू शकतात. मूक-कर्णबधिर संघटनेचा हा स्पर्धा आयोजित करून या मुलांमध्ये संवाद घडवून आणण्याचा, त्यांच्यामध्ये खिलाडू वृत्ती वाढवून आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. या मुलांना त्यांचे क्रीडागुण प्रदर्शित करण्याची संधी प्राप्त झाली आहे. यातून त्यांनी आपले क्रीडागुण सिद्ध करून दाखवावेत. पुढे यांच्यातूनच पॅरालिम्पिक्समध्ये देशाचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता असलेले क्रीडापटू निर्माण होतील.

यावेळी क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, महाराष्ट्र स्पोर्टस् कौन्सिल ऑफ डेफचे अध्यक्ष इर्शाद खान, मूक-कर्णबधिर असोसिएशनचे चेअरमन स्वप्नील पाटे आदींसह राज्यभरातून आलेले मूक-कर्णबधिर स्पर्धक उपस्थित होते.

# दिव्यांगांनी देशाचे नाव उंचवावे : कुलगुरू डॉ. शिंदे

## विद्यापीठात मूक-कर्णबधिर क्रीडा स्पर्धेस प्रारंभ

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

दिव्यांग विद्यार्थ्यांत सर्वसाधारण व्यक्तींपेक्षाही अधिक कार्यक्षमता असते. त्यांनी या क्षमतेच्या बळावर आपल्या देशाचे नाव उज्ज्वल होईल, अशी कामगिरी बजावावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग व मूक-कर्णबधिर असोसिएशन, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय मूक-कर्णबधिर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचा उद्घाटन समारंभ शुक्रवारी लोककला केंद्रात झाला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, मूक-कर्णबधिर मुलांमध्ये सहज संवादाच्या प्रेरणा असतात. त्यामुळे ते सर्वसाधारण व्यक्तींशी अतिशय उत्तम प्रकारे संवाद साधू शकतात. मूक-कर्णबधिर संघटनेचा स्पर्धा आयोजित करून या मुलांमध्ये संवाद घडवून आणण्याचा, त्यांच्यामध्ये खिलाडूवृत्ती वाढवून आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. या मुलांना त्यांचे क्रीडागुण प्रदर्शित करण्याची संधी प्राप्त झाल्यामुळे पुढे यांच्यातूनच पॅरालिम्पिक्समध्ये देशाचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता असलेले क्रीडापटू निर्माण होतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, महाराष्ट्र स्पोर्ट्स कौन्सिल ऑफ डेफचे अध्यक्ष इर्शाद खान, मूक-कर्णबधिर असोसिएशनचे चेअरमन स्वप्निल पार्टे आदी उपस्थित होते.

लोकमत

# दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये अधिक क्षमता

## देवानंद शिंदे : मूक-बधिर क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर :** दिव्यांग विद्यार्थ्यांत सर्वसाधारण व्यक्तींपेक्षाही अधिक कार्यक्षमता असते. त्यांनी या क्षमतेच्या बळावर आपल्या देशाचे नाव उज्ज्वल होईल, अशी कामगिरी बजावावी. या मुलांना त्यांचे क्रीडागुण प्रदर्शित करण्याची संधी प्राप्त झाल्यामुळे पुढे यांच्यातूनच पॅरालिम्पिक्समध्ये देशाचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता असलेले क्रीडापटू निर्माण होतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग व मूक-कर्णबधिर असोसिएशन, कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित अकराव्या मूक-कर्णबधिर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. लोककला केंद्रातील या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, मूक-कर्णबधिर संघटनेचा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे.

या कार्यक्रमास क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, महाराष्ट्र स्पोर्ट्स कौन्सिल ऑफ डेफचे अध्यक्ष ईर्शाद खान, कोल्हापूर जिल्हा मूक-कर्णबधिर असोसिएशनचे अध्यक्ष उद्धव पन्हाळकर, सचिव अमेय गवळी, आदी उपस्थित होते. राहुल चव्हाण यांनी स्वागत केले. मूक-कर्णबधिर असोसिएशनचे चेअरमन स्वप्नील पार्टे यांनी आभार मानले.

### राज्यातील खेळाडू सहभागी

**विद्यापीठाच्या मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातील ३१५ खेळाडू सहभागी झाले आहेत. थाळीफेक, गोळाफेक, कुस्ती, फुटबॉल, जलतरण अशा विविध १८ प्रकारांमध्ये उद्या, रविवारपर्यंत स्पर्धा चालणार आहे.**

# साहित्य संस्कृती मंडळावर डॉ. लवटे, शिंदे यांची निवड

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



डॉ. सुनीलकुमार लवटे



प्रा. डॉ. रणधीर शिंदे

महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळावर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे आणि शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांची निवड झाली. मंडळाने निवडीचे पत्र पाठवले असून, ही निवड तीन वर्षांसाठी राहणार आहे. मराठी साहित्य, संस्कृती, अप्रकाशित दुर्मीळ ग्रंथांचे प्रकाशन यासह वाचन चळवळ वाढवण्यासाठी संस्कृती मंडळाच्या माध्यमातून काम केले जाते.

राज्य सरकारने महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळावरील अध्यक्ष व सदस्यांच्या निवडी जाहीर केल्या. १९६० मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी पुढाकार घेऊन या मंडळाची स्थापना केली. मराठी साहित्य संस्थांना पाठबळ देणे, अप्रकाशित साहित्याचे प्रकाशन करणे, दुर्मीळ ग्रंथांचे प्रकाशन करून ते वाचकांपर्यंत पोहोचवणे, नियतकालिकांचे प्रकाशन, वाचन चळवळ वाढवणे, असे अनेक उपक्रम साहित्य संस्कृती मंडळाकडून नियमित राबविले जातात. याशिवाय नवलेखकांसाठी शिबिरांचे आयोजन करून त्यांच्या साहित्याचे संपादन, प्रकाशन करण्याचेही काम मंडळाकडून होते. कोल्हापुरातून यापूर्वी मंडळावर गो. मा. पवार, मा. गो. माळी, प्रा. डॉ. राजन गवस यांची निवड झाली होती. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी २०१० मध्ये मंडळाच्या सदस्यपदी काम केले आहे. 'दक्षिण महाराष्ट्रातील लोकसाहित्य, अलिखित साहित्य शब्दबद्ध करण्यासह साहित्य संस्थांना पाठबळ देण्याचे काम केले जाईल', अशी माहिती डॉ. शिंदे यांनी दिली.